# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबईतील पोलीसांना अद्ययावत शस्त्रे उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१) ६१८७ (०६-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.जयकुमार गोरे (माण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईवरील २६-११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर पोलीसांना अद्याप अद्ययावत शस्त्रे उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत आणि या संदर्भातील धोरणात बदल करणारी समितीही नेमण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच दहशतवादी हल्ल्यांची शक्यता लक्षात घेवून मुंबईसह राज्यातील सागरी सुरक्षेबाबत अहवाल देण्याचे आदेश न्यायालयाने जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान राज्य शासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यायालयाच्या या आदेशानुसार राज्य शासनाने या बाबतचा अहवाल सादर केला आहे काय,

(४) असल्यास, पोलीसांना अद्ययावत शस्त्रे उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मुंबईवरील दि.२६.११.२००८ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर मुंबईतील पोलीसांना वेळोवेळी अद्यावत शस्त्रे खरेदी करून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

तसेच महाराष्ट्र पोलीस दलासाठी शस्त्र धोरण निश्चित करण्यासाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार शासन मान्यतेने दि. १५.०४.२०१० च्या शासन निर्णयान्वये शस्त्र धोरण विहित करण्यात आले आहे. सदर शस्त्रास्त्र धोरणानुसार पोलीस

महासंचालक यांनी नेमलेल्या निवड समितीने प्रत्येक तीन वर्षाने शस्त्रास्त्र आढावा घेणे अनिवार्य करण्यात आल्यानुसार याबाबत आढावा घेवून दि. २८ नोव्हें. २०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.
(२) (३) हे खरे नाही.

मा. उच्च न्यायालयात दाखल क्रिमिनल पीआयएल ४१/२०११ मध्ये मा. उच्च न्यायालायाने दि. १३ जानेवारी २०१५ रोजी आदेश पारित केले होते सदर आदेशामध्ये त्यांनी उत्तन येथे सागरी पोलीसांनी किनार पट्टीच्या संरक्षणासाठी पुरेशी व्यवस्था केलेली आहे, अशीच व्यवस्था मुंबई शहर व महाराष्ट्राच्या पश्चिम किनार पट्टीवर करावी असे नमूद केलेले असून त्यामध्ये सागरी सुरक्षेबाबतचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिलेले नाहीत
(४) वरील (१) प्रमाणे
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील विविध रुग्णालयात पोस्टमॉर्टेम सेंटरचा तुटवडा असल्याबाबत

**(२) ८७९० (०६-०४-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राज पुरोहित (कुलाबा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत एकही नविन पोस्टमॉर्टेम सेंटर गेल्या १२ वर्षात सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामा, गोवंडी व कांदिवलीतील शताब्दी, मुंलुडमधील महात्मा फुले व सिध्दार्थ हॉस्पिटलमधील पीएम सेंटरचे प्रस्ताव मंजूर होऊन शासनाकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईत १४ ठिकाणी पोस्टमॉर्टेम सेंटर सुरु करण्यासाठी शासनाने १९९९ मध्ये शासन निर्णय काढून त्यापैकी फक्त नऊ ठिकाणीच पीएम सेंटर सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, मृतदेह बाहेरगावी न्यायचा असल्यास पीएमअभावी कित्येक तासांची प्रतिक्षा मृतांच्या नातेवाईकांना करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रलंबित पीएम सेंटरना मंजूरी देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

(३) व (४) सन १९९९ मध्ये एकूण १४ ठिकाणी पोस्टमॉर्टेम सेंटर सुरु करण्यासाठी मान्यता देण्यात आली असून सध्या मुंबईत एकूण १० ठिकाणी पोस्टमॉर्टेम सेंटर सुरु आहेत. तसेच कामा अँड आल्बेस रूग्णालय, महानगरपालिका मार्ग, मुंबई, शताब्दी रूग्णालय, कांदिवली, शताब्दी रूग्णालय, गोवंडी, महात्माफुले रूग्णालय, विक्रोळी येथील ४ ठिकाणच्या शवविच्छेदन केंद्रासाठी लागणारी ईमारत तसेच वातानुकुलित यंत्रणा मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून उपलब्ध करून दिल्यास तात्काळ शवविच्छेदन केंद्र चालू करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) हे खरे नाही.

ज्या मृतांच्या वारसांना मृतदेह बाहेरगावी न्यायचा असेल तर ताबोडतोब पोस्टमॉर्टेम करुन त्यांना मृतदेह ताब्यात दिला जातो व त्यांना प्रतिक्षा करावी लागत नाही.

(६) शासन स्तरावर पीएम सेंटरची मंजूरी प्रलंबित नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एच.ए.एल सोसायटी, ओझर येथे एफ.डी.आर. च्या कलर झेरॉक्स काढून सभासदांची करोडो रुपयांची झालेली फसवणुक**

**(३) १९१८० (०५-०९-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एच.ए.एल सोसायटी, ओझर येथे एफ.डी.आर. च्या कलर झेरॉक्स काढून सभासदांची करोडो रुपयांची फसवणुक केल्याप्रकरणी विशेष लेखा परीक्षक यांनी ओझर पोलीस स्टेशन येथे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल करुनही संचालकांना पोलीसांच्या दिरंगाईपणामुळे अटकपूर्व जामीन मिळण्यास मदत झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, रुपये ५९ कोटीच्या एफ.डी.आर. च्या कलर झेरॉक्स काढून सभासदांची करोडो रुपयांची फसवणुक करणाऱ्या संचालकांवर पोलीसांच्या उदासीनतेमुळे पायबंद घालता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१८) :** (१) व (२) सदर प्रकरणी ओझर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १३९/२०१३ भा.दं.वि. कलम ४०६, ४०८, ४०९, ४२०, ४७७ (अ), ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचा तपास मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशान्वये आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्यात एकूण २२ आरोपी असून सदर आरोपींना मा. न्यायालयाने अटक पूर्व जामीन मंजूर केला आहे.

सदर सोयटीच्या संचालकांनी ठेवीदारांच्या रु. १७ कोटीच्या ठेवी बँक ऑफ महाराष्ट्र, माहिम शाखा, मुंबई येथे एफ.डी. सर्विसेस या नावाने चालु खाते उघडून त्याचा अपहार केला आणि ठेवीदारांना बनावट एफ.डी. रिसीट तयार करुन त्या खऱ्या आहेत असे सांगून अशा बनावट गुंतवणूकीबाबत वार्षिक अहवालात नोंदी घेवून ठेवीदारांची फसवणूक केली आहे.

(३) व (४) याबाबत बँक ऑफ महाराष्ट्र, माहिम शाखा, मुंबई येथे एच.ए.एल. सोसायटी चे अधिकारी यांनी नमूद बँकच्या प्रत्येकी रु. ५० लाखाच्या एकूण ३४ बनावट एफ.डी. रिसीट तयार करुन त्याचा वापर केल्या प्रकरणी दिलेल्या तक्रारीवरुन आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथे गु.र.क्र. ६१/२०१२ नोंद करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांनी नमूद गुन्ह्यातील २३ आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केलेले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सागरी किनाऱ्याच्या सुरक्षिततेकरिता गस्तीसाठी असलेल्या बोटी नादुरुस्त असल्याबाबत

**(४) २८२१७ (०५-०९-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सागरी किनाऱ्याच्या सुरक्षिततेकरिता गस्तीसाठी असलेल्या २३ बोटी नादुरुस्त असून वापरविना त्या किनाऱ्यावर पडून आहेत तसेच संपुर्ण राज्याच्या सागरी किनाऱ्यावर गस्तीसाठी केवळ ३० ते ३५ बोटीचाच वापर होत असल्याचे दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबईतील सुमारे १४ बोटी व नवी मुंबईतील ३ बोटी माहे जून, २०१५ पासून बंद असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या सागरी किनाऱ्याच्या सुरक्षिततेसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

पावसाळ्यात महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड मार्फत दर वर्षीप्रमाणे दि.२६.०५.२०१५ पासून दि.३१.०८.२०१५ पर्यंत सर्व बंदरे बोट वाहतूकीस बंद करण्यात येते. या कालावधीत खराब हवामान व समुद्र खवळलेला असतो. सदर वातावरणात पोलीसांच्या बोटी ह्या आकाराने लहान व वजनाने हलक्या असल्यामुळे पोलीसांची सागरी गस्त हवामानाचा अंदाज घेऊन परिस्थितीनुसार चालू-बंद ठेवण्यात येत असते. या कालावधीत काही बोटी नियतकालीन देखभाल दुरुस्तीसाठी पाण्याच्या बाहेर काढून डागडूजी करण्यात येत असते.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत मुंबईतील एकूण ५ बोटी व नवी मुंबईतील २ बोटी ह्या माहे जून, २०१५ पासून बंद आहेत.
(३) सागरी गस्तीकरीता पुरविण्यात आलेल्या ६९ पोलीस बोटींपैकी केंद्रशासनाकडून प्राप्त २८ व राज्य शासनाकडून प्राप्त २९ वेगवान बोटींचा देखभाल व दुरुस्तीचा करार केंद्रशासनाने मे.गोवा शिपयार्ड कंपनी लि.,गोवा यांच्यासोबत केलेला आहे. तसेच जुन्या १२ बोटींची देखभाल व दुरुस्ती विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, पुणे व पोलीस उप आयुक्त, मोटार परिवहन विभाग, मुंबई यांच्यामार्फत वेळोवेळी केली जाते. त्यामुळे नादुरुस्त झालेल्या बोटी वेळीच दुरुस्त करुन गस्तीकरीता वापरल्या जातात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील मांडवे गावातील मतदारांची नोंदणी भैरवगड मतदार यादीत केल्याबाबत**

**(५) ३०४२३ (२३-१२-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील मांडवे गावातील मतदारांची नोंदणी भैरवगड मतदार यादीत केल्याप्रकरणी संबंधित मंडळाधिकारी व तलाठी यांच्यावर निलंबाची कारवाई करावी तसेच संबधित मतदारांची नावे त्यांची राहती घरे ज्या मांडवे गावातील वॉर्डमध्ये आहे तेथे समाविष्ठ करावीत, अशी मागणी करणारे निवेदन मांडवे गावातील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, सातारा यांना माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषी असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) होय.
(२) याबाबत उप विभागीय अधिकारी, कराड व तहसिलदार, सातारा यांचेमार्फत संबंधित तक्रारीचे निरसन करण्यात आले आहे. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) येथील बॉम्बस्फोट प्रकरणी निर्दोषपणे मुक्त झालेल्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(६) ५९३९८ (२४-०८-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) येथील दिनांक २५ सप्टेंबर २००८ मधील बॉम्बस्फोट प्रकरणात माहे एप्रिल, २०१६ मध्ये निर्दोष मुक्त झालेल्यांना आर्थिक मदत वा नुकसान भरपाई देण्याबाबतची मागणी पीडित कुटुंबातील नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, राज्यमंत्री (गृह/शहरे), मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) संबंधित राज्य पोलीस प्रशासनाच्या यंत्रणेकडे दिनांक २५ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास सविस्तर निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्नोक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१८) :** (१) मालेगाव बॉम्बस्फोट २००८ या गुन्ह्यातील दहशतवाद विरोधी पथकाने अटक करुन दोषारोप पत्र दाखल केलेल्या कोणत्याही आरोपीस कोर्टाने निर्दोष मुक्त केलेले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सावरगांव (मानेवाडी) (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील महिलांना भरघोस व्याजाचे आमिष दाखवून करण्यात आलेली फसवणूक

**(७) ५९९६५ (२३-०८-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावरगांव (मानेवाडी) (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील २० ते २५ महिलांना भरघोस व्याजाचे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक केल्याची बाब माहे मे, २०१६ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१८) :** (१) व (२) सावरगांव (मानेवाडी) (ता.पारनेर जि.अहमदनगर) येथील २० ते २५ महिलांची फसवणूक झाली आहे.

सदर महिलांची फसवणूक ही साई प्रसाद ग्रुप ऑफ कंपनी, चिंचवड येथे झालेली असून या कंपनीविरुध्द बी.के.सी. पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. २६८/२०१५, भा.दं.वि. कलम १८८, ४०६, ४०९, ४२०, १२० (ब) सह कलम ३, ४, ५, ६ पी.सी.एम.सी.बी. कायदा, १९७८ व एम.पी.आय.डी. कायदा, १९९९ कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल असून सदरचा गुन्हा पुढील तपासाकरीता आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई (गु.र.क्र. ८३/२०१५) येथे वर्ग करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्यात ५ आरोपींना अटक करण्यात आली असून मा. न्यायालयात नमूद आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

नमूद गुन्ह्यामध्ये आरोपींनी सुमारे २० लाख गुंतवणूकदारांना मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून सुमारे ४ हजार कोटी रुपयांची फसवणूक केलेली आहे. या प्रकरणी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये आरोपींच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या असून उक्त कायद्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळाच्या विकासाबाबत**

**(८) ६५९६८ (१०-०१-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी या विमानतळांचा विकास करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ११ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विमानतळांच्या विकासासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाच्या प्रादेशिक हवाई विस्तार कार्यक्रमांतर्गत “उडान” ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत असून याअंतर्गत राज्यातील अन्य ७ विमानतळांसह रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथील विमानतळे RCS विमानतळे म्हणून अधिसूचित करण्यात आली आहेत.

रत्नागिरी येथील विमानतळ हा भारतीय नाविक दलाच्या ताब्यात असून तो सद्यस्थितीत कार्यरत आहे. तथापि, “उडान” योजनेंतर्गत नागरी उड्डाणासाठी सदर विमानतळाचा विस्तार करण्यात येत असून या विस्तारीकरणाच्या जमीन संपादनासाठी राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळ विकसित करण्याचे काम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून मे. आय.आर.बी. सिंधुदुर्ग विमानतळ प्रा.लि. यांना ९५ वर्षांसाठी BOT तत्त्वावर देण्यात आले आहे. सद्यस्थितीत विमानतळाचे काम सुरु असून माहे जून, २०१८ पर्यंत हा विमानतळ कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील अनेक धार्मिक स्थळांना नियमित करण्याबाबत**

**(९) ६६८४५ (१०-०१-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांबाबत अनेक ठिकाणी वेगवेगळे वाद असल्यामुळे त्यांना न्यायालयाच्या आदेशानुसार नियमितता देताना सुमारे १८० धार्मिक स्थळे हटविण्यात येणार असून काही स्थळांचे स्थलांतर करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१८) :** (१) व (२) अहमदनगर जिल्ह्यातील एकूण ४१४५ अनधिकृत धार्मिक स्थळे जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी निश्चित केली असून त्याची वर्गवारी पुढीलप्रमाणे आहे:-

"अ" वर्गातील (नियमित करणे) ३९५३ अनधिकृत धार्मीक स्थळे होती. ३९५३ पैकी ३०४३ नियमित करण्यात आली, ९०१ खाजगी जागेवरील असल्याने व ९ दुबार नोंदविण्यात आल्याने त्यांना वगळण्यात आले.

"ब" वर्गातील (निष्कासित करणे) १६६ अनधिकृत धार्मीक स्थळे होती. १६६ पैकी ८७ नियमित करण्यात आली, ५४ निष्कसित करण्यात आली, ३ राज्यस्तरीय समितीकडे पाठविण्यात आली व २२ खाजगी जागेवरील असल्याने त्यांना वगळण्यात आले.

"क" वर्गातील (स्थलांतरीत करणे) २६ अनधिकृत धार्मिक स्थळे होती. २६ पैकी १० नियमित करण्यात आली, ९ स्थलांतरीत करण्यात आली, ७ खाजगी जागेवर असल्याने त्यांना वगळण्यात आले.

मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा बायपास ते शीळ महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(१०) ६७३८२ (०७-०२-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घोडबंदर रोड (जि. ठाणे) येथील वर्सोवा खाडीपुलाच्या दुरुस्तीच्या कामामुळे मुंब्रा बायपास ते शीळ महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंब्रा बायपास येथे दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा सुमारास वाहतूक कोंडी दूर करण्याकरिता आंदोलन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जेएनपीटी येथून गुजरातकडे जाणारी वाहने ठाणे - भिवंडी मार्गाऐवजी चाकण - नाशिक - धुळे - सुरत मार्गे सोडण्याकरिता गृह खात्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत तसेच कल्याणफाटा ते मुंब्रा बायपास येथील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१८) :** (१), (२), (३) व (४) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८ वर्सोवा खाडीवरील जुना पुल दुरुस्तीच्या कामानिमित्त बंद करण्यात आल्यामुळे मुंब्रा बायपास ते शिळ मार्गावरील वाहतूक मोठ्या प्रमाणांत वाढल्यामुळे वाहतूक कोंडी होत होती. त्यामुळे दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात आले होते.

जेएनपीटी येथून गुजरातकडे जाणारी वाहने ठाणे-भिवंडी मार्गाऐवजी चाकण - नाशिक - धुळे - सुरत मार्गे सोडण्याकरीता यासंदर्भात भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सुरत यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यास अनुसरुन जिल्हादंडाधिकारी, ठाणे शहर यांनी दिनांक ०१.०९.२०१६ अन्वये वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी केली होती. तसेच दिनांक १३.०९.२०१६ च्या अधिसूचनेनुसार जे.एन.पी.टी. येथून मुंब्रा बायपास - घोडबंदर मार्गे अहमदाबाद दिशेने जाणारी वाहतूक रा.म.क्र. ३ वरुन तसेच कल्याण फाटा येथून कल्याण-दुर्गाडी-रांजनोली मार्गे वळविण्यात आली होती. शहर वाहतूक विभागाकडून अतिरिक्त रोड बंदोबस्त नेमून अधिसूचनेप्रमाणे वाहतुक वळवून वाहतूक सुनिश्चित ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सायन (मुंबई) रुग्णालयातील डॉक्टरांनी स्त्री रुग्णाच्या दोन्ही किडण्या काढल्याबाबत

**(११) ६९६९४ (१६-०१-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील सायन रुग्णालयातील डॉक्टरांनी दिनांक १६ एप्रिल, २०१३ रोजी शस्त्रक्रियेच्या नावाखाली एका स्त्री रुग्णाच्या दोन्ही किडण्या काढल्यानंतर सदर रुग्ण दिनांक १७ एप्रिल, २०१६ रोजी मयत झाल्यानंतर रुग्णालय प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने तातडीने सदर मृत रुग्णाचे अंत्यसंस्कार केल्याचे दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मृत व्यक्तीचा पोस्टमार्टम रिपोर्टसुध्दा ३ वर्षापासून गोपनीयतेच्या नावाखाली राखून ठेवला गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणातील दोषींवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) उक्त अपमृत्यू बाबत कोणत्याही प्रकारची नोंद उपलब्ध नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंधेरी (प) येथे मोठ्या प्रमाणात होणारी वाहतूक कोंडी**

**(१२) ७४२२७ (२०-०४-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (प) येथील जुहू चर्च रोड, गांधीग्राम रोड व मिलेक्ट्री रोड येथे रहादारीतल्या वाहनांचा मोठ्या प्रमाणात खोळंबा होत असल्याच्या तक्रारी सांताक्रूझ वाहतूक विभाग व अंधेरी आरटीओ यांना दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने अंधेरी आरटीओ व सांताक्रूझ वाहतूक विभाग यांच्या मार्फत संयुक्तरित्या कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच उद्‌याप कोणतीही कार्यवाही न करणा-या सर्व संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१८) :** (१) होय.

(२) सदर तक्रारींच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे :-

i) माहे जानेवारी, २०१७ मध्ये ५२ व माहे मे, २०१७ मध्ये २८ वाहनचालकांवर अंधेरी आरटीओ व सांताक्रुझ वाहतूक विभाग यांच्यामार्फत वरील परिसरात संयुक्त कारवाई करुन त्यांचे परवाने ९० दिवसांकरीता निलंबित करण्याची कारवाई केलेली आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अनुक्रमे ३१ व ५० वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे.

ii) नमूद भागातील तक्रारींसंदर्भात दिनांक १३.०५.२०१७ रोजी सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई तसेच सहायक पोलीस आयुक्त (पश्चिम परिक्षेत्र) यांचेसह प्रत्यक्ष जुहू चर्च रोड व आजूबाजूच्या परिसरास भेट देऊन पायी गस्त करुन पाहणी केली. लोकप्रतिनिधी व नागरीकांच्या भेटी घेऊन त्यांच्या वाहतुकीसंबंधीच्या समस्या समक्ष समजावून घेतल्या. त्या भागात कायमस्वरुपी मनुष्यबळ वापरणे, साईनबोर्ड लावणे, रस्त्यावर बेशिस्तपणे वाहने पार्क करणाऱ्यांविरुध्द क्रेनच्या सहाय्याने कारवाई करणे व वाहतुकीचे सुयोग्य नियमन करणेबाबत आदेशित केलेले आहे, त्याप्रमाणे नमूद भागात नियमितपणे कारवाई चालू आहे.

iii) सहायक पोलीस आयुक्त, पश्चिम परिक्षेत्र (वाहतूक), मुंबई यांच्या अधिपत्याखाली १२ लोकांचे विशेष पथक तयार करुन १ महिना अवैध पार्किंगच्या अनुषंगाने ७०४२ वाहनांवर कारवाई करण्यांत आली आहे.

iv) नमूद भागात अवैध पार्किंगद्‌वारे व वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या जड वाहनांवर भारतीय दंड संहिता कलम २८३ अन्वये जुहू पोलीस ठाण्यात एकूण ११ गुन्हे व सांताक्रुझ पोलीस ठाण्यात एकूण ६ दखलपात्र गुन्हे दाखल करुन वाहनचालकांवर कारवाई करण्यांत आली आहे. तसेच ७ अवजड वाहनांच्या मालकांना नोटीसा बजावण्यांत आल्या आहेत. ईर्ला सोसायटी, जुहू येथे फेरीवाल्यामुळे वाहतुकीची कोंडी होत असल्याने त्यांचेवर कारवाई करण्यासाठी सहायक महानगरपालिका आयुक्त, के/पश्चिम विभाग यांना सूचना देण्यांत आल्या आहेत.

v) जुहू चर्च रोड येथे वाहतुक नियमनासाठी ४ अतिरिक्त पोलीस अंमलदारांची नेमणूक करण्यात आली आहे.

vi) सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई यांनी दिनांक ०४.०७.२०१७, ०८.०९.२०१७ व दिनांक ०१.११.२०१७ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींसमवेत बैठक घेऊन त्यांच्या समस्या जाणुन घेऊन कार्यवाहीचा आढावा घेतला व कार्यवाही करण्याचे आदेशित केले. तसेच दिनांक १०.११.२०१७ रोजी स्थानिक शाळांच्या मुख्याध्यापक / प्रतिनिधीची यांचेसमवेत बैठक घेऊन विद्यार्थ्यांना शाळेच्या बसेसने येण्यासाठी प्रोत्साहन देणे, शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळी ट्रॅफिक वार्डनची नेमणूक करणे, वेळेचे नियमन करणे, शाळेच्या बस शाळांच्या मैदानात पार्किंग करणे इ. सूचना देण्यांत आल्या आहेत.

vii) सांताक्रुझ वाहतुक विभागास वाहतुकीचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी २ अधिकारी व १० अतिरिक्त पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणुक करण्यांत आली आहे.

viii) जुहू चर्च रोड, गांधीग्राम रोड, जुहू मार्केट, मुक्तेश्वर देवालय मार्ग, रुईया पार्क तसेच जुहू तारा रोड, वैकुंठलाल मेहता रोड, एस.व्ही.रोड व इस्कॉन परिसरात आवश्यक साईन बोर्ड लावण्यांत आले आहेत.

ix) सदर परिसरात माहे जानेवारी, २०१७ ते नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत खालीलप्रमाणे कारवाई करण्यांत आली आहे :-

| ठिकाण | टोईंग कारवाई | नो-पार्किंग कारवाई | मो.वा.का. अंतर्गत इतर कलमांखाली कारवाई |
|---|---|---|---|
| जुहू चर्च रोड | १०६१ | १५४२ | ६०७ |
| गांधीग्राम रोड | ७११ | १३६५ | ४५२ |
| मिलीटरी रोड | १६२१ | १३३५ | ५०१ |
| एकूण | ३३९३ | ४२४२ | १५६० |

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुळे येथील सुरत-नागपूर महामार्गावरील मुकटी गावाजवळ दोन ट्रकची धडक होऊन अपघात झाल्याबाबत

**(१३) ७४३७५ (२०-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील सुरत-नागपूर महामार्गावरील मुकटी गावाजवळ दोन ट्रकची धडक होऊन एक जण ठार तर दोन जण जखमी झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर वारंवार अपघात होऊनही शासन त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महामार्गावरील अपघात रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१८) :** (१) दिनांक ०४.०१.२०१७ रोजी सकाळी ०८.०० वा. चे सुमारास राष्ट्रीय महामार्गा क्रमांक ६ वर धुळे पारोळा रोडवर मुकटी, ता.धुळे गांवाजवळ दोन ट्रकदरम्यान अपघात झाला. सदर अपघातामध्ये एक चालक मरण पावला तर दुसरा चालक व इतर एक असे दोन जण जखमी झाले.
(२) व (३) याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ०७/२०१७, भा.दं.वि. कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, ४२७ सह मो.वा.का. कलम १८४ नुसार दिनांक ०५.०१.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अपघातातील आरोपी ट्रकचालक हा गंभीर जखमी झाल्याने त्यास औषधोपचारासाठी त्याचे नातेवाईकांनी त्याचे राहते गांवी विजयवाडा (आंध्रप्रदेश) येथे घेऊन गेले असता तो उपचार घेत असतांना मरण पावला. आरोपी मरण पावल्याने मंचावरम या स्थानिक पोलीस स्टेशनमार्फत त्याचे प्रेतावर इन्क्वेस्ट पंचनामा करुन पुढील रितसर कार्यवाही केलेली आहे.

अशाप्रकारचे अपघात रोखण्यासाठी सदर रस्त्यावर गतिरोधक टाकणे, रस्त्यावरील खड्डे दुरुस्त करणे, मार्गदर्शक फलक लावणे इ. बाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविल्यानुसार संबंधीत विभागाकडून त्यानुसार कार्यवाही करण्यांत आली आहे. तसेच धुळे तालुका पोलीस ठाण्यामार्फत वाहनांवर खालीलप्रमाणे केसेस करण्यांत आलेल्या आहेत.

| | सन २०१६ | एप्रिल, २०१७ पर्यंत |
|---|---|---|
| चोरटी प्रवासी वाहतूक | ३४ | २ |
| वसूल करण्यांत आलेला दंड | ४६,००० | २,५०० |
| मो.वा.का. अन्वये करण्यांत आलेल्या केसेस | ७४८ | ८६ |
| वसूल करण्यांत आलेला दंड | १,१९,००० | १७,९०० |
| एकूण वसूल दंड | १,६५,००० | २०,४०० |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील ११८ गावांपैकी १०५ गावामध्ये अधिकृत पोलीस पाटील पद रिक्त असल्याबाबत**

**(१४) ७९५३० (२०-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील ११८ गावांपैकी १०५ गावामध्ये अधिकृत पोलीस पाटील पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांमध्ये पोलीस पाटील पद रिक्त असल्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात पोलीस पाटीलाची पदे रिक्त असण्याची कारणे काय व सदर पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

करमाळा तालुक्यातील ११८ गावांपैकी पोलीस स्टेशन व आऊटपोस्ट असलेल्या ठिकाणची ४ पदे कमी झाल्याने उर्वरित ११४ पैकी १४ गावांमध्ये कायम पोलीस पाटील आहेत, तर १०० गावांमध्ये पोलीस पाटील पद रिक्त आहे.
(२) हे खरे नाही.

सध्या कार्यरत असलेल्या कायम व हंगामी पोलीस पाटील यांना रिक्त गावांच्या पोलीस पाटील पदाचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. तसेच पोलीस पाटील पद रिक्त असल्यामुळे नागरिकांची गैरसाय होत असल्याबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(३) शासनाने पोलीस पाटील पद भरती प्रक्रियेस स्थगिती दिलेली असल्याने पोलीस पाटीलांची पदे रिक्त राहिली होती. सदर स्थगिती आता उठविण्यांत आली असून करमाळा तालुक्यातील ७६ गावांमध्ये दिनांक ०९.११.२०१७ रोजी जाहीरनामा प्रसिध्द केला आहे व नियमानुसार पोलीस पाटील पदी नियुक्त्या करण्यांत येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सांगली, सातारा तसेच कोल्हापूर जिल्ह्यामध्ये वाहने चोरुन भंगारात विकणाऱ्या टोळ्या कार्यरत असल्याबाबत

**(१५) ७९८३२ (२०-०४-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली, सातारा तसेच कोल्हापूर जिल्ह्यामध्ये डंपर व इतर चार चाकी वाहने चोरुन भंगारात विकणाऱ्या टोळ्या कार्यरत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर टोळ्यांनी वाहन चोरीबरोबरच इतरही अनेक गंभीर गुन्हे केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी करुन संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१७) :** (१) होय.

सदर प्रकरणी सातारा, सांगली, पुणे, सोलापूर, रायगड या जिल्ह्यात डंपर चोरीला गेल्याबाबत खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) फलटण पोलीस स्टेशन, सातारा येथे गु.र.नं.१९०/२०१५ भा.दं.वि.कलम ३३९, ३४.

२) भुईंज पोलीस स्टेशन, सातारा येथे गु.र.नं. २३५/२०१६ भा.दं.वि.कलम ३३९, ३४.

३) म्हसवड पोलीस स्टेशन, सातारा येथे गु.र.नं.२०३/२०१६ भा.दं.वि.कलम ३३९, ३४.

४) कुरळप पोलीस स्टेशन, सांगली येथे गु.र.नं. १३९/२०१५ भा.दं.वि.कलम ३३९, ३४.

५) महाड एमआयडीसी पोलीस स्टेशन, रायगड येथे गु.र.नं. ६१/२०१६ भा.दं.वि.कलम ३३९, ३४.

६) महाड एमआयडीसी पोलीस स्टेशन, रायगड येथे गु.र.नं. ६१/२०१६ भा.दं.वि.कलम ३३९, ३४.

७) इंदापूर पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.नं. ०८/२०१७ भा.दं.वि.कलम ३३९, ३४.

८) बारामती शहर पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.नं. ७७३/२०१६ भा.दं.वि.कलम ३३९, ३४.

९) यवत पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.नं. ३९/२०१७ भा.दं.वि.कलम ३३९, ३४.

१०) यवत पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.नं. ६३/२०१५ भा.दं.वि.कलम ३३९, ३४.

११) वेळापूर पोलीस स्टेशन, सोलापूर ग्रामीण येथे गु.र.नं. ६३/२०१५ भा.दं.वि.कलम ३३९, ३४.

(२) हे खरे नाही.

सदर टोळ्यांनी वाहन चोरीव्यतिरिक्त इतर गंभीर गुन्हे केल्याचे उघडकीस आलेले नाही.

(३) उक्त गुन्ह्यांपैकी म्हसवड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२०३/२०१६ या गुन्ह्यात एकूण ६ आरोपींना अटक करण्यात आले असून, त्यांच्याकडून डंपरची चेसी सह एकूण १०,२०,०००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. अटक आरोपींनी वरीलप्रमाणे नमूद ११ गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## निळवंडे (जि.अहमदनगर) धरणात विस्थापीत झालेल्या आदिवासींची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आल्याबाबत

**(१६) ८०८३१ (२१-०४-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील निळवंडे धरणात विस्थापीत झालेल्या आदिवासी तुकाराम ढगे व लहू रामा ढगे यांचे नातेवाईक महादू रामा ढगे यांनी खोटे दस्तऐवज सादर करुन शासनाकडून देण्यात आलेल्या कोट्यवधी रुपये परस्पर मिळवून फसविल्याचे कातळापूर येथे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अकोले पोलीसांकडे तक्रार दाखल केली असूनही पोलीस प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने ढगे कुटुंबीय तहसील कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याबाबत जिल्हाधिकारी यांना निवेदन पाठविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी शासनास प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने चौकशी केली असता, चौकशीमध्ये कोणत्याही खोट्या कागदपत्रांच्या आधारे रक्कम अदा केलेली नसुन पूनर्वसन विभागाने मा. न्यायालयाच्या आदेशान्वये श्री.सहादु रामा ढगे यांना रक्कम अदा केलेली आहे, असे निष्पन्न झाले आहे. तसेच, शासनाच्या कोणत्याही विभागाकडून शासनाची फसवणुक झाल्याचे निष्पन्न झाले नाही. या प्रकरणी संपूर्ण कार्यवाही मा. न्यायालयाचे आदेशाने झालेली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

### चंद्रपूर जिल्ह्यातील गुप्ता एनर्जी कंपनीने कर्मचा-यांचे वेतन दिले नसल्याबाबत

**(१७) ८१७८३ (२१-०४-२०१७). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील गुप्ता एनर्जी कंपनीने कर्मचाऱ्यांचे वेतन दिले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुप्ता एनर्जी मध्ये घुग्घूस, उसगाव, पांढरकवडा, शेनगांव परिसरातील शेतकऱ्यांची उपजाऊ शेती अधिग्रहण करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच येथील प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्यात सामावून घेण्यात आले आहेत काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०९-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
कामगारांचे ऑक्टोबर, २०१६ पासून वेतन थकित आहे.
(२) हे खरे नाही.
सदरहू प्रकल्पाकरिता जमीन अधिग्रहीत करण्यात आलेली नसून वाटाघाटीने खरेदी करण्यात आलेली आहे.
(३) सदर जमीन धारक प्रकल्पग्रस्त नसल्यामुळे नोकरीत सामावून घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील नगरपालिकाक्षेत्रात वाढत्या वाहनसंख्येमुळे वाहतूक कोंडी होत असल्याबाबत**

**(१८) ८२२३३ (२०-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील नगरपालिकाक्षेत्रात वाढत्या वाहनसंख्येमुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी होत असून अपुऱ्या पोलीस संख्येमुळे प्रत्येक ठिकाणी पोलीस पुरविणे ग्रामीण पोलीसांना शक्य होत नसल्यामुळे उक्त जिल्ह्यातील १३ नगरपालिकांसाठी ट्रॅफिक प्लॅन तयार करण्याचे काम ग्रामीण पोलीसांनी सुरु केले असल्याचे दिनांक २६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नगरपालिकांपैकी ५ नगरपालिकांचा प्लॅन तयार झाला असुन उर्वरित नगरपालिकांचा प्लॅन तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रातील १३ शहरातील नगरपालिकांचा वाहतुक आराखडा तयार करण्याचे कामकाज सुरु करण्यात आले असून त्यापैकी बारामती, चाकण, तळेगांव दाभाडे, सासवड, इंदापूर, जेजूरी, भोर, लोणावळा, जुन्नर व खेड या १० नगरपालिकांचा वाहतुक आराखडा तयार करण्याचे काम पुर्ण झाले आहे. उर्वरित दौंड, आळंदी व शिरुर या शहरातील नगरपालिकांचा वाहतूक आराखडा स्थानिक अडीअडचणी समजून घेऊन तयार करण्याचे काम चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव येथील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत मुदतबाह्य माल सापडल्याबाबत**

**(१९) ८२४०८ (२०-०४-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव येथील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत मुदतबाह्य माल सापडल्यामुळे सबंधित पुरवठादार व गोडाऊन मालकावर गुन्हा दाखल करण्याबाबत पंचायत समिती शिक्षण विभाग, जळगाव यांनी दिनांक ३० नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा याचेकडे एका पत्रान्वये विनंती करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्रान्वये पोलीस विभागामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे व त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१७) :** (१) जळगाव येथील शाळेय पोषण आहार योजनेंतर्गत मुदतबाह्य माल सापडल्यामुळे पंचायत समिती शिक्षण विभाग, जळगाव यांनी संबंधित

पुरवठादार व गोडाऊन मालक यांचे विरुध्द संयुक्तरित्या तक्रार दाखल करण्यात येत आहे असे पत्र दिनांक ३० नोव्हेंबर, २०१४ रोजी पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांना दिलेले आहे. परंतु प्रत्यक्षात या पत्रासोबत कोणत्याही प्रकारची फिर्याद अथवा गुन्हा दाखल करण्याबाबत विनंती केलेली नाही.

(२) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जळगाव व अधिक्षक शालेय पोषण आहार पंचायत समिती जळगाव यांना स्थानिक गुन्हे शाखा जळगाव कडील पत्र जावक क्र.३८५६/स्थागुशा/ शालेय पोषण आहार/२०१७ जळगाव दि.३१/०७/२०१७ अन्वये एमआयडीसी पोलीस स्टेशन, जळगाव येथे जावून रितसर तक्रार नोंदविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. याप्रकरणी अद्यापि गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

(३) विलंब झालेला नाही.

---

**वसई (जि.पालघर) या भागातील एका राजकीय पक्षाच्या युवा आघाडीच्या जिल्हाध्यक्षांवर प्राणघातक हल्ला झाल्याबाबत**

**(२०) ८४७८० (११-१०-२०१७). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) या भागातील एका राजकीय पक्षाच्या युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्री. विजेंद्र सिंह यांच्यावर कृष्णा हॉटेल, अग्रवाल सर्कल, वसई, नालासोपारा लिंक रोड येथे दिनांक १४ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास एका प्रादेशिक पक्षाशी संबंधित सुमारे २० महिलांचा समावेश असलेल्या शेकडोंच्या जमावाने हल्ला केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील घटना त्या परिसरातील सी.सी.टी.व्ही. वर चित्रित झाली असून प्रत्यक्ष साक्षीदार उपलब्ध असतानाही सुरुवातीला याकडे दुर्लक्ष्य करीत वालीव पोलीस ठाणेचे अमंलदारानी राजकिय दबावाखाली एफ.आय.आर. नोंदवण्यास टाळाटाळ केली व त्यानंतर आरोपींना वाचवण्याच्या उद्देशाने, जाणीवपूर्वक भा.दं.वि. कलमांचा गैर वापर करीत एफ.आय.आर. दाखल केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनेतील आरोपीला एका आठवड्यानंतर अटक करून त्याच दिवशी त्यांना सोडून देण्यात आले, त्याचबरोबर आरोपींच्या जामिनाला पोलिसांनी हरकत/आक्षेपही घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्यांवर शासनातर्फे कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सदर घटना सी.सी.टी.व्ही. मध्ये चित्रीत झाली असून या फुटेजच्या आधारे गुन्हयाचा तपास केला आहे. वालीव पोलीस ठाणे अंमलदाराने एफ.आय.आर. नोंदविण्याकरीता टाळाटाळ केली नसून सदर गुन्हयाचे घटनास्थळ तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याने,

तुळींज पोलीस ठाणे येथे गु. र.क्र. ३०४/२०१६ भा.दं.वि. कलम ३५२, १४३, १४७, १४८, ५०४ सह मुंबई पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. एफ.आय.आर. नोंदविण्याकरीता फिर्यादी आल्यानंतर तात्काळ गुन्हा नोंदविला असून फिर्यादीत नमूद मजकुराप्रमाणे भा.दं.वि. कलमे लावण्यात आलेली आहेत. सदर गुन्ह्यात एकूण ९ आरोपी असून, यापैकी ४ आरोपी स्वत:हून मा. न्यायालयात हजर झाले तर ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सर्व आरोपी जामीनावर मुक्त आहेत. एका आरोपीस सी.आर.पी.सी. ४१(अ) (१) प्रमाणे नोटीस बजावली आहे. आरोपींच्या जामीनास तपासी अंमलदाराने विरोध केला होता परंतु, मा. न्यायालयाने आरोपींना जामीनावर मुक्त केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील निलेश रेवाराम भिल व गणपत रेवाराम भिल ही दोन मुले बेपत्ता झाल्या प्रकरणाबाबत**

**(२१) ८४८४४ (०४-०९-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील निलेश रेवाराम भिल व गणपत रेवाराम भिल ही १२ व ७ वर्षे वयाची दोन मुले बेपत्ता झाल्याप्रकरणी पो. निरिक्षक अशो कडलक यांचेकडे दिनांक २० मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार प्राप्त निलेश भिल व त्याचा भाऊ या दोघांच्या अचानक बेपत्ता होण्याप्रकरणी तपास पूर्ण झाला आहे काय व तपासाचे निष्कर्ष काय आहेत व तद्‌नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार प्राप्त निलेश भिल याला शासनाच्या नियमानुसार आवश्यक ते सर्व सहकार्य व मदत करण्यात आली नसल्याबद्दलची बाब तपासात निदर्शनास आली असून सदर मदत नाकारणाऱ्यां सबंधीतांविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१७) :** (१) होय.

सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीवरून मुक्ताईनगर पोलीस स्टेशन भाग-५ येथे गु.र.नं. ८६/२०१७ भा.दं.वि.क.३६३ नुसार अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) गुन्ह्याच्या तपासात सदर मुलांना कोणीही फूस लावून अगर आमिष दाखवून पळवून नेले नसून वडीलांनी रागावल्याने निलेश भिल हा गणपत भिल यास सोबत घेऊन निघून गेला असल्याचे निष्पन्न झाले आहे. यातील एका मुलाचा शोध लागला असून बेपत्ता बालक निलेश याचा कसोशिने शोध सुरू असून सदर गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(३) हे खरे नाही.

(४) विलंब झालेला नाही.

---

**विदर्भातील वाळू ठेकेदाराला कारवाईची धमकी देऊन १० लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या टंकलेखकावर कारवाई करण्याबाबत**

**(२२) ८४९३६ (०४-०९-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील वाळू ठेकेदाराला कारवाईची धमकी देऊन १० लाख रूपयांची खंडणी मागणाऱ्या मा.पर्यावरण मंत्री यांच्या टंकलेखकाला माहे मे, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहामध्ये वा त्या दरम्यान अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर टंकलेखकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

उक्त प्रकरणी मलबार हिल पोलीस ठाण्यात दि.५.५.२०१७ रोजी गु.र.क्र.४८/१७ कलम ३८४, ३४ भादंविसं अन्वये गुन्हा नोंद झाला आहे. दोन आरोपींना अटक करण्यात आली. सदर आरोपी जामीनावर असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईतील जेट्टींची दुरुस्ती करणेबाबत**

**(२३) ८५२९४ (०४-०९-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील जेट्टी जुन्या झाल्या असून त्यांची दुरवस्था झाली असल्याने त्या वापरात नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जेट्टी अभावी मच्छीमार व्यवसाय बंद पडला असून एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी खाडी मार्गाने जाणे बंद झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाशीगाव व करावे या जेट्टींची दुरुस्ती व विस्तार करण्याबाबत मा. स्थानिक लोकप्रतिनिधीनी मेरीटाईम बोर्डामार्फत पाठविलेल्या प्रस्तावास पर्यावरण विभागाची अद्यापी परवानगी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, परवानगी मिळण्याबाबत व जेट्टी बांधण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) १) दिवागांव नवी मुंबई येथे प्रवासी जेट्टी बांधणे

२) वाशीगाव, नवी मुंबई येथे प्रवासी जेट्टी बांधणे

३) करावे, नवी मुंबई येथे प्रवासी जेट्टी बांधणे ही कामे करण्याच्या अनुषंगाने पर्यावरण विभाग आणि वन विभागाच्या परवानगीकरिता प्रस्ताव सादर करण्यात आला होता.सदर प्रस्ताव पर्यावरण विभागाने अमान्य केला आहे. तसेच शासन निर्णय मत्स्यव्यवसाय विभाग दिनांक १६.०८.२०१४ नुसार मच्छिमारांशी निगडीत सर्व कामे मत्स्यव्यवसाय विभागाकडे वर्ग करण्यात आली आहेत. शासन निर्णयानुसार वरील कामे त्या विभागाकडे निधीसह हस्तांतरीत करण्यात येत आहेत.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक वसाहती, टेक्स्टाईल, बांधकाम, हॉटेल- रेस्टॉरंट, दगडखाण, वीटभट्टी, सफाई या क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षेबाबत**

**(२४) ८६१६७ (०४-०९-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक वसाहती, टेक्स्टाईल, बांधकाम, हॉटेल-रेस्टॉरंट, दगडखाण, वीटभट्टी, सफाई अशा अनेक क्षेत्रात सुमारे १० लाखांहून अधिक कामगार काम करीत असून त्यांच्या सुरक्षेबाबत शासनाकडे कोणतीही मदतीची योजना नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यात गंवडी, सेंट्रिग, सुतार, फरशी, पॉलिश, वायरमन, वेल्डर आणि इतर बांधकाम कामगारांसाठी लागू करण्यात आलेल्या वैद्यकीय विमा गत दोन वर्षापासून बंद असल्याने ५७ हजार नोंदणीकृत कामगार वैद्यकीय विमा योजनेपासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार औद्योगीक वसाहतीमध्ये ४ लाख, असंघटीत क्षेत्रामध्ये १ लाख, बांधकाम क्षेत्रामध्ये १ लाख, हॉटेल २० हजार, साखर कारखाने २० हजार या सर्व कामगारांसाठी कामगार कल्याणकारी योजना नसल्याने किमान वेतन, निवृत्ती वेतन, आरोग्यविषयक सुविधा मिळण्याकरीता बांधकाम कामगारांची नोंदणी करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजनात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०९-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

शासनाने इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील कामगारांसाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना केली असून सदर मंडळामार्फत सद्यस्थितीत २४ कल्याणकारी योजना नोंदीत बांधकाम कामगारांसाठी राबविल्या जातात.

(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणारी वैद्यकीय विमा योजना ऑगस्ट,२०१५ पासून बंद असून त्या ऐवजी मंडळाने जिवीत नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्यावर अवलंबित कुटूंबियाकरीता दि.२ जून, २०१६ आणि दि.२१,सप्टेंबर,२०१६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य विमा योजना लागू करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत २४ कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली जात असून मंडळातील नोंदीत असलेल्या ६,२८,०७१ कामगारांपैकी ५,२५,७७५ लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी २४१ कोटींचा खर्च करण्यात आला आहे.

शासनाने बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी दि.१८.८.२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे बांधकाम कामाच्या व्याख्येमध्ये २१ नवीन कामांचा समावेश केला आहे. बांधकाम कामगारांना मंडळाकडे नोंदणीसाठी आवश्यक असलेले ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र देण्याकरिता शासन परिपत्र दि.२७.६.२०१७ अन्वये मुख्याधिकारी/ आयुक्त यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी व दि.२२.०९.२०१७ रोजीच्या शासन परिपत्रकाद्वारे ग्रामसेवक यांना प्राधिकृत केले आहे.

शासनाने दि.१५.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम कामगारांची नोंदणी व लाभाचे वाटप करण्यासाठी राज्यातील नोंदणीकृत मजदूर संघटनांना मदतनीस म्हणून मान्यता दिली आहे. तसेच, असंघटीत कामगारांसाठी "असंघटीत कामगार कल्याण मंडळ" स्थापन करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून मंडळाची स्थापना झाल्यावर असंघटीत कामगारांकरीता विविध कल्याणकारी योजना राबविणे शक्य होईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पारनेर तालुक्यातील (जि.अहमदनगर) वडझिरे ते कान्हूरपठार रस्त्यावर तसेच देऊळगांव राजा तालुक्यातील (जि.बुलढाणा) बामखेड रस्त्यावर अवैध दारूची वाहतूक करतांना पकडल्याबाबत

**(२५) ८६५८१ (०४-०९-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारनेर तालुक्यातील (जि.अहमदनगर) वडझिरे ते कान्हूरपठार रस्त्यावर वेसदरे घाटात बोलेरा गाडीतून सुमारे ५ लाख रूपयाची गावठी दारु टायरच्या ट्यूबमध्ये पोलीसांनी केलेल्या कारवाईत सापडल्याची घटना दिनांक १७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, देऊळगांव राजा (जि.बुलढाणा) पोलीसांनी दिनांक १२ जून, २०१७ रोजी अवैध दारूची वाहतूक करतांना एकास रंगेहात पकडल्याची घटना ताजी असतांनाच देऊळगांव राजाहून सिंदखेड राजाकडे असोला बामखेड रस्त्याने देशी दारूने भरलेली हूंदाई कारमधून ९६० बॉटल असा एक लाख रूपयांचा मुद्देमाल दिनांक १८ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास बामखेड रस्त्यावर सिंदखेड राजा पोलीसांनी पकडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन्ही जिल्हयात अवैधरित्या दारू वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक १६ मे, २०१७ रोजी पारनेर तालुक्यातील (जि. अहमदनगर) वडझिरे ते कान्हूरपठार रस्त्यावर वेसदरे घाटात बोलेरो गाडीतून टायरच्या ट्यूबमध्ये रू.६०,०००/- किंमतीची बेकायदेशीर गावठी दारू व रू.४,५०,०००/- किंमतीची गाडी व इतर असा एकूण रू.५,१०,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पारनेर पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं. ५९/२०१७ मु.प्रो.ॲक्ट ६५ (इ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आलेली आहे.

(२) दिनांक १६ जून, २०१७ रोजी देऊळगांव राजाहून सिंदखेड राजाकडे असोला बामखेड रस्त्याने हूंदाई गाडीतून अवैध देशी दारूची वाहतूक करताना ३ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून रू.४९,०००/- किंमतीची ९६० बॉटल देशी दारू व रू.१,००,०००/- किंमतीचे वाहन असा एकूण रू.१,४९,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी सिंदखेड राजा पोलीस स्टेशनमध्ये गु.र.नं. ९६/२०१७ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ख) (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

माहे जानेवारी ते ऑगस्ट, २०१७ मध्ये अवैध दारुबाबत करण्यात आलेल्या कारवाईची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| जानेवारी ते ऑगस्ट २०१७ | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | जिल्हा | दाखल केसेस | अटक आरोपी | जप्त मुद्देमाल |
| १ | अहमदनगर | २३५९ | २५१६ | रु.१,६४,६६,२९७/- |
| २ | बुलढाणा | २६३४ | २६४९ | रु.२,७३,१८,३४४/- |

(४) व (५) पारनेर (जि.अहमदनगर) व देऊळगांव राजा (जि.बुलढाणा) येथील गुन्हयातील आरोपींना अटक करून त्यांचेविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. सदर गुन्हे न्यायालयात प्रलंबित आहे.

(६) विलंब झालेला नाही.

---

**सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांने वरिष्ठांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत**

**(२६) ८६६६९ (२३-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांने वरिष्ठांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी करण्यात आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर घटनेबाबत सोलापूर लोहमार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.नं.४५/२०१७ भा.दं.वि. कलम ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचे दोषारोपपत्र मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रेल्वे कोर्ट दौंड येथे सादर केले असून खटला न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथे सिप पॉलिसीच्या रोख रक्कमेचा धनादेश देण्याच्या मोबदल्यात कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यातून ऑनलाईन पध्दतीने रक्कम ट्रान्सफर करुन केलेला अपहार**

**(२७) ८६९६२ (१८-०८-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे सिप पॉलिसीच्या रोख रक्कमेचा धनादेश देण्याच्या मोबदल्यात कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यातून २ लाख ११ हजार रुपयांचा अपहार झाल्याची घटना सिडकोतील गणेश चौकात माहे मे, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले

(३) असल्यास, तदनुसार अपहार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच अपहाराची रक्कम परत मिळविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणाबाबत दि. ५/०५/२०१७ रोजी अंबड पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे गु.र.नं. १८७/२०१७ आयटी ॲक्ट ६६ (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

याप्रकरणी सायबर गुन्हे शाखेकडून ३ आरोपींची नावे निष्पन्न झाली असून आरोपींचा शोध घेवून त्यांना अटक करणेकामी तपास चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालवण तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) कर्ली खाडीपात्रातील काढण्यात येणारा गाळ खाडीपात्रातील त्सुनामी बेटावरच टाकला जात असल्याबाबत**

**(२८) ८७१४७ (०४-०९-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) कर्ली खाडीपात्रात देवबाग गावानजीक राज्य शासनाच्या बंदर विभागाच्या वतीने ड्रेझर मशीनच्या सहाय्याने खाडीपात्रातील गाळ उपसा करण्याचे काम माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पासून सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाडीतून काढण्यात येणारा गाळ खाडीपात्रातील त्सुनामी बेटावरच टाकला जात असल्याने सदर गाळ पावसाळ्यात पुन्हा खाडीपात्रात पसरणार असल्याने देवबागच्या सरपंचानी सदर गाळ उपसा करण्याचे काम बंद पाडले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोट्यवधी रुपये खर्च करुन काढण्यात येणारा खाडीतील गाळ मच्छिमार, ग्रामस्थ व पर्यटन व्यावसायीकांना त्रासाचा होऊ नये यासाठी बंदर विभागाने कोणती पर्यायी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे व त्याची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०१-२०१८) :** (१) होय.
(२) नाही.

देवबाग ता.मालवण येथील कर्ली खाडीतील देवबाग संगमानजीक असलेल्या त्सुनामी बेटाची उंची कमी झाल्यामुळे त्या ठिकाणी असलेला गाळ काढून त्सुनामी बेटावर टाकण्यात यावा अशी मागणी स्थानिक पर्यटक संस्था, जलवाहतूक संस्था यांच्याकडून करण्यात आलेली होती. त्यानुसार देवबाग संगमाजवळील गाळ ड्रेझर द्वारे काढून त्सुनामी बेटावर टाकण्यात आलेला आहे.

देवबाग ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग येथे त्सुनामी बेटावर गाळ काढण्यात आल्यामुळे वाळूचे योग्य तऱ्हेने नियोजन झाल्यामुळे त्याचा फायदा गावाला झालेला आहे. सदर ड्रेझरद्वारे गाळ काढण्यासाठी मुदतवाढीकरीता ग्रामपंचायत देवबाग यांच्याकडून मागणी करण्यात आलेली होती.

देवबाग येथे खाडीतील करण्यात आलेले गाळ उपसणीचे काम समाधानकारक झाल्याबाबत ग्रामपंचायत देवबाग यांनी कळविले आहे. त्या अनुषंगाने देवबाग येथे खाडीतील गाळ काढल्याबाबत स्थानिक पातळीवरुन कोणतीही समस्या उद्‌भवलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नांदेड जिल्हयात पासपोर्ट सेवा केंद्र सुरू करणेबाबत

**(२९) ८७२७४ (१२-०९-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयात शिक्षण, हजयात्रा, विदेशी पर्यटनस्थळ पाहण्यासाठी अनेक नागरीक इच्छुक असतात, परंतु जिल्हयात पासपोर्ट सेवा केंद्र नसल्यामुळे नांदेड, जालना, लातूर, हिंगोली, परभणी, उस्मानाबाद या जिल्हयातील नागरीकांना नागपूर जिल्हयात पासपोर्ट काढण्यासाठी जावे लागत असल्याने अनेक पर्यटनप्रेमी यापासून वंचित राहत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हयातील नागरीकांकडून नांदेड जिल्हयात पासपोर्ट सेवा केंद्र सुरु करावे, अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्हयातील नागरीकांसाठी नांदेड येथे पासपोर्ट सेवा केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०१-२०१८) :** (१), (२) व (३) विदेश मंत्रालय, भारत सरकार यांच्या जा.क्र.Q/States/४१०/१/२०१४, दि.२२.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये नांदेड येथे पासपोर्टशी संबंधीत सेवा पुरविण्यासाठी पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र (POPSK) सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार गृह विभाग, महाराष्ट्र राज्य पत्र क्र.एमआयएस.२०१७/प्र.क्र.२३/विदेशी-२, दि.०४.०७.२०१७ अन्वये उक्त प्रकरणी योग्य ती कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी नांदेड आणि पोलीस अधीक्षक, नांदेड यांना निर्देश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सटाणा तालुक्यात (जि.नाशिक) क्षमतेपेक्षा जास्त रेतीची वाहतूक होत असल्याबाबत

**(३०) ८७५७७ (०४-०९-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सटाणा तालुक्यात (जि.नाशिक) क्षमतेपेक्षा जास्त रेतीची वाहतूक करणारे अकरा वाळूचे डंपर सटाणा व जायखेडा पोलिसांनी दिनांक १७ मे, २०१७ रोजी पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१७) :** (१), (२) व (३) होय.

सटाणा तालुक्यात पोलीसांनी सटाणा ते देवळा रोडवर दि.१८/०५/२०१७ रोजी क्षमतेपेक्षा जास्त रेतीची वाहतूक करणारे ०९ वाळूचे डंपर पकडले होते. सदर डंपर ओव्हरलोड असल्याने व गौण खनिज संपत्ती असल्याने मा. कार्यकारी दंडाधिकारी, सटाणा यांनी पकडलेल्या ०९ डंपरवर दंडात्मक कारवाई करुन एकूण १५,२७,०००/- रुपये इतका दंड वसुल केला आहे.

दि.१७/०५/२०१७ रोजी जायखेडा पोलीसांनी ताहाराबाद पिंपळनेर रोडवर ताहाराबाद बसस्टॅडजवळ ०२ डंपर पकडले होते. सदर डंपरवर तहसिलदार सटाणा व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी दंडात्मक कारवाई केली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**मौजे बेलवंडी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे भरारी पथकाने देशी-विदेशी दारुचा साठा पकडल्याबाबत**

**(३१) ८७७८९ (०४-०९-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बेलवंडी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे भरारी पथकाने देशी-विदेशी दारुचा सुमारे २१ हजार ९३० रुपयांचा साठा पकडल्याची घटना माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार भविष्यात छुप्या मार्गाने आयात करुन विक्री होऊ नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी बेलवंडी पोलीस स्टेशन, श्रीगोंदा येथे गु.र.नं.III ३३/२०१७ मु. प्रोव्ही ॲक्ट कलम ६५ (ई) प्रमाणे दि.१२/०४/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपीस अटक करुन त्यांच्याकडून एकूण २१,९३०/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण करुन आरोपीस अटक करुन त्यांच्याविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

भविष्यात सदर गुन्ह्यांना आळा घालण्याकरिता नाकाबंदी करुन व नाईट पेट्रोलिंगद्वारे वाहने तपासली जात आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

**ठाणे येथे उधारी घेतलेले पैसे मागितल्याच्या रागातून मुंबई पोलीस दलातील कॉस्टेबल यांनी एका तरुणाच्या अंगावर गाडी नेल्याबाबत**

**(३२) ८८०९६ (०४-०९-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथे उधारी घेतलेले पैसे मागितल्याच्या रागातून मुंबई पोलीस दलातील कॉंस्टेबल रमेश आवटे यांनी अतुल पेठे या तरुणाच्या अंगावर गाडी चालवुन त्याला फरफटत नेल्याचा प्रकार माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन सदर पोलीस कॉंस्टेबलवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) आरोपी पोलीस नाईक ३३०८३ रमेश किसन आवटे याने दि.३/५/२०१७ रोजी मा.प्रथमवर्ग २ रे न्यायालय, ठाणे येथे शरणागती पत्करल्याने मा.न्यायालयाने त्यांना मुदतीत लायक जामिन दिल्याने जामिनावर मुक्त केले आहे. सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आय.टी.आय. संस्थेत मुलींना मोफत प्रशिक्षण देण्याबाबत**

**(३३) ८८४७८ (०४-०९-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून कारखान्यास लागणारे कुशल मनुष्यबळ निर्माण केले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ३५९ तालुक्यातील ४१७ शासकीय औद्योगिक संस्थामध्ये महिलांसाठी ३० टक्के जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रत्यक्षात आर्थिक दुर्बल घटक कुटुंबातील मुलींना शैक्षणिक खर्च परवडत नसल्याने मुलींचे प्रवेशाचे प्रमाण कमी असल्याचे आढळून येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महिलांचा व्यवसाय शिक्षणात आय.टीय.आय. संस्थेत सहभाग वाढवून त्यांना सक्षम करण्यासाठी मुलींसाठी मोफत प्रशिक्षण योजना राबविण्याबाबत शिवाजीनगर मतदार संघ, पुणे येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी स्वरुपात मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, आय.टीयआय. संस्थेत मुलींना मोफत प्रशिक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये ऑगस्ट २०१७ या प्रवेश सत्रात एकूण ८६,२११ उमेदवारांचे प्रवेश झालेले आहेत, त्यापैकी १७,४२४ मुलींचे प्रवेश झालेले आहेत.
(४) होय, हे खरे आहे.
(५) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षण हे प्रात्यक्षिकाभिमुख असून सदर प्रात्यक्षिकासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्री उपकरणे व साहित्याचा खर्च शासनाकडून करण्यात येतो. प्रति उमेदवार प्रति प्रशिक्षणार्थी करण्यात येणाऱ्या खर्चाच्या तुलनेत प्रशिक्षणार्थ्यांकडून आकारण्यात येणारे प्रशिक्षण, प्रवेश व परिक्षा शुल्क नगण्य आहे. त्यामुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मुलींना मोफत प्रशिक्षण देण्याबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील बंद पडलेल्या वसंत सहकारी सूत गिरणीच्या इमारतीत मोठ्या प्रमाणात अवैध व्यवसाय सुरू असल्याबाबत.

**(३४) ८८६३७ (०४-०९-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील बंद पडलेल्या वसंत सहकारी सूत गिरणीच्या इमारतीत मोठ्या प्रमाणात अवैध व्यवसाय सुरू असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यंत्राच्या सुट्या भागाची अवैध व्यावसायिकांकडून महागडे साहित्य चोरीला गेले असून प्रशासनाने प्रतिबंधित करावे अशी शहरातील नागरिकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर विभागासाठी गुन्हयांचे प्रकटीकरण घटनास्थळीच व्हावे याकरिता शासनाकडून देण्यात आलेल्या फिरत्या प्रयोगशाळेच्या वाहनाबाबत**

**(३५) ८८७५२ (०४-०९-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर विभागासाठी गुन्हयांचे प्रकटीकरण घटनास्थळीच व्हावे याकरिता शासनाकडून देण्यात आलेली फिरत्या प्रयोगशाळेचे वाहन तज्ञ व अधिकारी नसल्यामुळे पोलीस मुख्यालयात गत अनेक महिन्यांपासून पडून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर फिरत्या प्रयोगशाळेचे वाहन कार्यन्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) :** (१) कोल्हापूर येथील प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या कार्यक्षेत्रातील जिल्हयांमध्ये गुन्हयांबाबत पोलीस विभागामार्फत संदेश प्राप्त होताच तात्काळ प्रयोगशाळेतील अधिकारी व कर्मचारी गुन्हयाच्या घटना स्थळांना भेटी देण्यासाठी पाठविले जातात.
(२) व (३) मोबाईल फॉरेन्सिक सपोर्ट युनिटवरील ४५ सहायक रासायनिक विश्लेषकांची नियमित मंजूर पदे महराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तथापि सदर पदे उपलब्ध होई पर्यंत दि.२३.०८.२०१७ च्या शासन निर्णयानुसार ४५ मोबाईल सपोर्ट युनिट करिता ४५ सहायक रासायनिक विश्लेषकांची पदे करार पध्दतीने ठोक मानधनावर भरण्यास मान्यता दिली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक मोबाईल फॉरेन्सिक सपोर्ट युनिटच्या कार्यक्षेत्रातील पोलीस दलातील विज्ञान शाखेतील पदवी प्राप्त असलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षीत मोबाईल व्हॅन युनिटवर सहायक रासायनिक विश्लेषक नियमित तत्वावर उपलब्ध होईपर्यत नियुक्ती देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्री हरचरण विनय याने देशभक्तीच्या नावावर लोकांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत**

**(३६) ८९१६४ (०४-०९-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अज्ञात व्यक्तीने मा. पंतप्रधान यांच्या नावाचा गैरवापर करून भारतीय सैन्यांच्या आधुनिकतेसाठी तसेच शहीद व जखमी जवानांसाठी वेलफेयर फंड बॅटल कॅज्युअल्टीज या खात्यात आर्मी वेलफेयर फंड या नावाने चंद्रपूर जिल्ह्यातील स्टेट बॅक ऑफ इंडिया या शाखेत पैसे जमा करण्याचे भावनिक आवाहन माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खात्याचे पैसे श्री हरचरण विनय या व्यक्तीने एटीएम द्वारे काढले असून नवी दिल्ली येथील निवासी श्री आरती यांच्या नावे स्टेट बॅक ऑफ इंडिया चंद्रपूर येथे खाते आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले आहे व तद्नुसार सदर आरोपींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. नवी दिल्ली येथील निवासी श्री.आरती यांच्या नावे स्टेट बँक ऑफ इंडीया चंद्रपूर येथे खाते असून सदर खात्याचे पैसे श्री.हरचरण विनय या नावाच्या व्यक्तीने एटीएम द्वारे काढले आहे याबाबत तक्रार प्राप्त नाही.

(३) व (४) चंद्रपूर जिल्ह्यातील कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये किंवा कार्यालयात या संदर्भाची कोणतीही तक्रार / निवेदन प्राप्त झाले नसल्याने प्रकरणाची चौकशी करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील महाविद्यालयाच्या रस्त्यावरील रहिवासी वस्तीत**
**स्पाच्या नावाखाली कुंटणखाणा सुरु असल्याबाबत**

**(३७) ९०२८४ (०४-०९-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील महाविद्यालयाच्या रस्त्यावरील रहिवासी वस्तीत स्पाच्या नावाखाली कुंटणखाणा सुरु असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेत तरुण मुलींना पार्लरच्या नावाखाली कामे देवून कुंटणखाना व्यवसायात ओढले जात असून त्यामुळे अशा निष्पाप तरुणींना वाम मार्गाला लावण्याचे प्रकार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कुंटणखाना चालवणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय.
(४) गंगापूर पोलीस ठाणे येथे गुरनं १५८/१७ अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम कलम ३,४,५,७(१)(ब) अन्वये ६ आरोपी विरूध्द गुन्हा दाखल करण्यात येऊन ५ आरोपींना अटक करण्यात आलेली असून १ आरोपी पोलीस तपासात मिळून आलेला नाही. सद्यस्थितीत गुन्हा पोलीस तपासावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे अस्थी कलश घेऊन मुंबईत आलेल्या शेतकऱ्याला अटक केल्याबाबत**

**(३८) ९१०५२ (०४-०९-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध भागांतील आत्महत्या केलेल्या सुमारे २५ शेतक-यांचे अस्थी कलश घेऊन कोल्हापूर येथील एक शेतकरी दिनांक २७ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास मुंबई येथे आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शेतकऱ्याला आमदार निवासातून पोलिसांनी अटक केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शेतकऱ्याला अटक करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अटक करण्यात आली नाही.

---

**परडवाडी (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील मातंग बांधवांच्या स्मशान भूमिवर अतिक्रमण करुन अंत्यसंस्कार करण्यास गावगुंडांनी मनाई केल्याबाबत**

**(३९) ९१३४८ (०४-०९-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परडवाडी (ता.नायगाव, जि.नांदेड) येथील मातंग समाजाच्या स्मशान भूमीवर अतिक्रमण करुन दिनांक ९ मे, २०१७ रोजी मातंग बांधवांच्या मृताचा अंत्यविधी करण्यास गावगुंडांनी धमकावून मनाई केल्याची तक्रार पोलीस अधीक्षक नांदेड व जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी तहसिलदार नायगाव यांनी स्मशान भूमीची जागा सात गुंठे असल्याचे जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांच्या निदर्शनास आणूनही संबंधितांवर कोणतीच कारवाई न केल्याने मृतदेह १२ तास ताटकळत ठेवावा लागला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास याप्रकरणी अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे परडवाडी  या गावतील धनगर अथवा मातंग  समाजासाठी  स्मशानभुमी नसल्याने मातंग समाजाचे लोक दशरथ परडे यांनी खरेदी केलेल्या शेतजमिनीत अंत्यविधी करण्याचा आग्रह करीत होते. त्यास श्री. परडे यांचा विरोध असुन यास्तव त्यांनी प्रथम श्रेणी न्यायालय नायगाव, नांदेड येथे दिवाणी दावा क्र.८२/२०१६ दाखल केला आहे. त्यामध्ये मा.न्यायालयाने श्री. परडे यांच्या शेतजमीनीत कोणत्याही व्यक्तीने अंत्यविधी करु नये असा मनाई हुकूम दि.०६/१२/२०१६ रोजी जारी केला आहे.

दि.०९/०५/२०१७ रोजी गंगाधर वाघमारे यांच्या अंत्यविधी वेळी उपविभागीय दंडाधिकारी, बिलोली, तालूका कार्यकारी दंडाधिकारी, बिलोली व बंदोबस्तावरील पोलीस अधिकारी यांनी मा.न्यायालयाचे निर्देश संबंधीत समाजाच्या लोकांना समजावुन श्री. वाघमारे यांचा अंत्यविधी गावातील रोडलगतच्या शासकीय जमिनीत केला आहे. त्यावेळी कोणत्याही व्यक्तीकडुन मातंग समाजाच्या लोकांना धमकावण्याचा प्रकार घडलेला नाही.

स्मशानभुमीच्या कारणांवरुन दखलपात्र गुन्हे घडु नये व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी दि.२२/०९/२०१६ रोजी पोलीस स्टेशन कुंटुर येथे चाप्टर केस २५५/२०१६ कलम फौ.प्र.स १०७ अन्वये तीन व्यक्तिंविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

---

## औरंगाबाद शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वसतीगृहाच्या इमारतीच्या दुरवस्थेमुळे विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय

**(४०) ९१४२५ (०४-०९-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात रेल्वे स्टेशन परिसरात शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) असून तेथिल वसतीगृहाची गत २ वर्षापासून अत्यंत दुरवस्था झाली असल्याने प्रवेश घेतलेल्या ग्रामीण विद्यार्थ्यांना आर्थिक भार सोसून इतरत्र राहावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतीगृहाच्या दुरुस्तीसाठी सुमारे ९५ लक्ष रु.च्या निधीची आवश्यकता असून सदर निधी अद्यापपर्यंत जिल्हा नियोजन मंडळाने दिलेला नसल्याने याही वर्षी विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हा निधी तात्काळ उपलब्ध करून सदर वसती गृह सुरु करण्याबाबत शासन स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१०-०१-२०१८) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) विचाराधिन प्रकरणी आवश्यक असलेला निधी प्राप्त करवून घेण्यासाठी संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनाल यांच्या मार्फत जिल्हा नियोजन समिती कडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मेहुणबारे (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मुलींचे अपहरण होण्याच्या घटना

**(४१) ९१८२१ (०४-०९-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मेहुणबारे हे चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यातील एक महत्वाचे व मोठे पोलीस ठाणे असून या पोलीस ठाण्याच्या हद्दीत गत ७/८ महिन्यात ४/५ मुलींचे अपहरण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आपल्या अल्पवयीन मुलीला "लव जिहाद" सारख्या प्रकरणात मुस्लीम तरुणाने पळविले असून ५० दिवस उलटले तरी अजून पोलीस तपास करीत नाही म्हणून मुलीच्या मातापित्यांनी दिनांक २६ जून २०१७ रोजी दुपारी ३ वा.पोलीस स्टेशन समोर विष प्राशन केले असून त्यांची प्रकृती गंभीर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणात पोलीस आरोपी मुलगा व त्याच्या वडिलांना मदत करतात तसेच सदर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक अवैध धंदे चालतात अशीही तक्रार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-११-२०१७) :** (१) हे खरे नाही.
माहे मे २०१७ मध्ये एका मुलीचे अपहरण झाले असून त्या संदर्भात गुन्हा दाखल आहे.
(२) हे खरे नाही.

पिडीतेचे आई व वडील यांनी दिनांक २४/५/२०१७ रोजी आत्मदहनाचा इशारा दिलेला होता. त्यानुसार ते दिनांक २६/५/२०१७ रोजी पोलीस ठाण्याच्या समोर किटकनाशक औषधाच्या

बाटल्या जवळ बाळगुन आत्महत्या करण्याचा कांगावा/देखावा केल्याने त्यांना त्वरीत ताब्यात घेऊन त्याची वैद्यकीय तपासणी केली त्याच्या विरूध्द क्रि.प्रो.को.क १०७ नुसार प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सदर गुन्ह्यात मुख्य आरोपीस त्याचे आई, वडील व नातेवाईक हे सहकार्य करीत असल्याचे तपासात दिसून आल्याने त्यांचे विरूध्द मेहुणबारे येथे गुरनं २९/२०१७ भादंविक ३६३,३६६,३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

मेहुणबारे पोलीस स्टेशन येथे पिडीत मुलीने दिलेल्या जबाबावरून ३ आरोपीच्या विरूध्द भादविक ३६३,३६६,३७६(२),३४ व लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण अधिनियम सन २०१२ चे कलम ४,५,६ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. तसेच, तीनही आरोपीस जामिन मिळाला असून त्यांचे विरूध्द दिनांक १८/१०/२०१७ रोजी मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर केलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला शहरातील म्हैसांग रोड परिसरात सहकार, महसूल विभाग व पोलीस दलाच्या संयुक्त पथकाने छापा टाकून अवैध सावकारीचा पर्दाफाश केल्याबाबत**

**(४२) ९१८८१ (०४-०९-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील म्हैसांग रोड परिसरात दिनांक १३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास सहकार, महसूल विभाग व पोलिस दलाच्या संयुक्त पथकाने छापा टाकून अवैध सावकारीचा पर्दाफाश केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या छाप्यात किती जणांना अटक करण्यात आली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

दि.३०/५/२०१७ रोजी उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांनी त्यांचे स्टाफसह, सरकारी पंच व पोलीस कर्मचाऱ्यांना घेवून छापा टाकला असता संत कबीर नगर अकोट फाईल, अकोला येथील आरोपी राहत असलेल्या घरात सावकारी व्यवहारासंबंधाचे दस्तऐवज मिळून आल्याने उपनिबंधक यांच्या लेखी तक्रारीवरुन पो. स्टे. अकोट फाईल, अकोला येथे अप.क्र.१३०/१७ कलम ३९ महाराष्ट्र सावकारी प्रतिबंध अधिनियम २०१४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे व त्यानुसार एका आरोपीस दि.१९/५/२०१७ रोजी अटक करण्यात आली आहे. गुन्ह्यातील साक्षीदारांचे जबाब नोंदविणे सुरु असून गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कजगांव (ता.भडगांव, जि.जळगांव) येथील अवैध धंद्यामुळे गावविकासावर विपरित परिणाम होत असल्याबाबत**

**(४३) ९१९९१ (०४-०९-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कजगांव (ता.भडगांव, जि.जळगांव) येथील अवैध धंद्यामुळे गावविकासावर विपरित परिणाम होत असल्यामुळे याबाबतच्या तक्रारी ग्रामस्थांनी वारंवार स्थानिक पोलीस स्थानकांत केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी पोलीस प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१७) :** (१) हे खरे आहे.

ग्रामस्थांकडून अवैध धंद्यांसंदर्भात उपाययोजना करणेबाबत निवेदन देण्यात आले आहे.

(२) कजगांव (ता.भडगांव) हद्दीत पोलीसांची नजर चुकवून अवैध धंदे करणाऱ्या गुन्हेगारांविरूध्द सातत्याने खालील प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| सन | सट्टा जुगार/पत्ता जुगार केसेस | | |
|---|---|---|---|
| | केसेस | आरोपी | जप्तमाल |
| २०१६ | १६ | १९ | रु.३८,३०५/- |
| २०१७ (३०/०९) | १० | ४८ | रु.१,६६,०१०/- |
| सन | दारुबंदी केसेस | | |
| | केसेस | आरोपी | जप्तमाल |
| २०१६ | ४३ | ४६ | रु.७२,२५०/- |
| २०१७ (३०/०९) | ४७ | ४७ | रु.१,९४,२९०/- |

ग्रामस्थांमार्फत अवैध धंद्यांची माहिती उपलब्ध होताच सक्रिय गुन्हेगारांविरूध्द कायदेशीर कारवाई पुर्ण करण्यात आली असून यापुढेही अवैध धंद्यांविरूध्दच्या कारवाईत सातत्य राहण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत सर्व प्रभारी अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

---

**देवलापार (जि.नागपूर) येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था मंजूर करण्याबाबत**

**(४४) ९२००१ (०४-०९-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासीबहुल भाग असलेल्या देवलापार (जि.नागपूर) परिसरातील विद्यार्थी गत अनेक वर्षांपासून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या (आयटीआय) प्रतिक्षेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात ७ उच्च माध्यमिक विद्यालय असून व्यावसायिक शिक्षणाची कुठलीही सोय नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेकदा मागणी करूनही येथे आयटीआय मंजूर होत नाही, मंजूर झालेले आयटीआय संस्था इतरत्र हलविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या भागात आयटीआय संस्था मंजूर करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार प्रत्येक तालुक्यात एक औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करणे अपेक्षित आहे. सद्य:स्थितीत रामटेक तालुक्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्था, रामटेक तसेच आदिवासी आश्रम शाळा बेलदा अशा दोन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, रामटेक येथे ०९ विविध व्यवसाय अभ्यासक्रम सुरू असून बेलदा येथील आदिवासी आश्रम शाळेमध्ये ०४ अभ्यासक्रम सुरू आहेत.
(३) देवलापार येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था मंजूर झालेली नाही. त्यामुळे इतरत्र हलविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) देवलापूर, ता. रामटेक, जि. नागपूर येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील उस्थळा दुमाला येथे संभाजी भदगले यांच्या घरी घरफोडीची घटना घडल्याबाबत

**(४५) ९२२४२ (०४-०९-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील उस्थळा दुमाला दिनांक ९ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास संभाजी भदगले यांच्या घरी घरफोडी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घरफोडीत किती रूपयांचा ऐवज व रोख रक्कम लुटण्यात आली आहे,
(३) असल्यास, या घटनेतील किती आरोपींना अटक केली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर घटनेबाबत नेवासा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३०६/२०१७ भा.दं.वि. कलम ४५७, ३८० प्रमाणे दि.०९/०६/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर घरफोडीत

श्री. भदगले यांच्या घरातून  सोन्याचे १२ तोळे दागिने व १८,०००/- किंमतीचे दोन मोबाईल असा एकूण ३,१८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेला आहे.

सदर गुन्हयात आरोपींचा शोध घेतला असता आरोपी मिळून आलेले नाहीत. आरोपी निष्पन्न करणे व त्यांना अटक करण्यावर सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**चांदा शिवारातून (जि.अहमदनगर) वाहणाऱ्या मूळा धरणाच्या परीसरातील दोन हातभट्ट्यांवर सोनई पोलिसांनी छापे घातल्याबाबत**

**(४६) ९२२४३ (०४-०९-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदा शिवारातून (जि.अहमदनगर) वाहणाऱ्या मूळा धरणाच्या कालव्याच्या कडेने उगवलेल्या वेड्याबाभळीच्या दाट जंगलात असलेल्या दोन हातभट्ट्यांवर सोनई पोलिसांनी दिनांक २१ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास छापे घातले, हे खरे आहे काय,

(२)  असल्यास, या छाप्यात किती मुद्देमाल व किती जणांना अटक करण्यात आली आहे,

(३) असल्यास, त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर ठिकाणी दि.२०/०४/२०१७ रोजी टाकलेल्या छाप्यात २१५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. तसेच, दि.२१/०४/२०१७ रोजी टाकलेल्या छाप्यात २६००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपीविरुध्द गुन्हा रजि. नं.III ३४/२०१७  म. प्रोव्हीं ॲक्ट कलम ६५(ई) अन्वये कारवाई करुन एका आरोपीस अटक करुन मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**बेलपिंपळ (ता.नेवासा, जि.अहमदनगर) गावातील घरफोड्यांच्या प्रकरणांबाबत**

**(४७) ९२२४७ (०४-०९-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलपिंपळ (ता.नेवासा, जि.अहमदनगर) गावात माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान ५ ठिकाणी घरी घरफोड्या करण्यात आल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घरफोडीत किती रूपयांचा ऐवज व रोख रक्कम लुटण्यात आली आहे,

(३) असल्यास, या घटनेतील किती आरोपींना अटक केली व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१७) :** (१) हे खरे नाही.

माहे १ जून २०१७ ते ३० जून २०१७ या कालावधीत बेलपिंपळगांव येथे घरफोडी/ चोरीच्या घटनेबाबत कोणतीही फिर्याद नसल्याने गुन्हा दाखल नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विक्रोळी (मुंबई) येथील के.व्ही.व्ही. इंग्लिश हायस्कुलमधील विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी केस कापल्याबाबत**

**(४८) ९३४०५ (२३-०८-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई परिसरातील विक्रोळी येथील टागोर नगर क्रमाक ४ येथील कमलाताई वासूदेव वायकर या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांना केस कमी ठेवण्याचे निदेश दिले असूनही इयत्ता पाचवी ते नववीपर्यंतच्या वर्गातील केस वाढविलेल्या मुलांना शाळेतील शिक्षक श्री.मिलीद झनेक यांनी वर्गाबाहेर नेऊन शिपाईच्या मदतीने २५ विद्यार्थ्यांचे केस कापल्याचे दिंनाक १ जुलै २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केस कापतांना कांही विद्यार्थ्यांना गंभीर जखमही झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी विद्यार्थ्यांच्या पालकांनी विक्रोळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असतांनाही अद्याप चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे, खरे नाही.

(४) संबधीत ३ आरोपी विरूध्द विक्रोळी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १८२/१७ कलम ३२४,३५५,३४ भा.दं.वि. सह ७५ जेजे ॲक्ट २०१६ अन्वये दाखल गुन्ह्यामध्ये दोषारोपपत्र दाखल केले असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उपस्थित होत नाही.

---

**ईद-उल-आझा या पवित्र सणामध्ये कुर्बानी देण्यात येणाऱ्या जनावरांच्या व्यापारांना एनजीओ गोरक्षाच्या नावाने त्रास देण्याची बाब**

**(४९) ९३६५३ (१४-०८-२०१७). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ईद-उल-आझा या पवित्र सणामध्ये देण्यात येणाऱ्या कुर्बानिमध्ये कुर्बानी देण्यात येणाऱ्या जनावरांच्या व्यापारांना नेहमी तथाकथित एनजीओ गोरक्षाच्या नावाने त्रास देण्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०१७) :** (१) हे खरे नाही. राज्यात सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक यांच्या कार्यक्षेत्रात कुठेही अशा प्रकारची घटना घडल्याबाबतचा गुन्हा दाखल नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाहीत.

---

**पश्चिम महाराष्ट्रात दरोडेखोरांची दहशत निर्माण झाल्याबाबत**

**(५०) ९४९४७ (१३-१०-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर - सांगली रस्त्यावर असलेल्या उदगाव येथे दरोडेखोरांनी एका निवृत्त प्राध्यापकाच्या घरावर हल्ला करून घरातील सोने पैसे लुटले व पत्नीस ठार मारले व प्राध्यापक यास गंभीर जखमी केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच दरम्यान सांगली जिल्ह्यातील कडेगावला एका आमदाराच्या पेट्रोल पंपावर गोळीबार करून लूट केली तसेच सातारा जिल्ह्यातील वडगाव हवेली येथे दरोडा पडला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कराडमध्ये गुंडाची दहशत वाढल्याचे निदर्शनास आले असून, या सर्व प्रकारामुळे जनतेमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत व सदर परिसरातील गुन्हेगारीला प्रतिबंधित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०१७) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

कराडमध्ये गुंडाची दहशत वाढल्याचे निदर्शनास आलेले नाही. सन २०१७ मध्ये कराड शहरात फिर्यादिनुसार गुन्हे दाखल करून गुंडावर कायद्याचा वचक राहावा याकरिता योग्य ती कायदेशीर कार्यवाही तसेच, ठोस प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.
(४) उदगाव येथील दरोडेखोरांनी केलेला हल्ला व चोरीच्या घटनेबाबत दि.१४/०८/२०१७ रोजी जयसिंगपुर पोलीस ठाण्यामध्ये गु.र.क्र.२००/२०१७ भा.दं.वि.स. कलम ३९६, ३९७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्यामध्ये निष्पन्न ७ आरोपींपैकी ४ आरोपींना अटक करण्यात आली असून ३ आरोपी फरार आहेत. सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे.

कडेगाव येथील पेट्रोलपंपावरील चोरी संदर्भात दि.५/८/२०१७ रोजी कडेगाव पोलीस ठाण्यामध्ये गु.र.क्र.९३/२०१७ भा.दं.वि.स. कलम ३९२, ३४ सह भा.ह. कायदा कलम ३, २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्यामध्ये निष्पन्न ४ आरोपींपैकी २ आरोपींना अटक करण्यात असून १ आरोपी फरार आहे. तसेच, एक विधिसंघर्षित बालकास ताब्यात घेतल्यानंतर न्यायालयाचे आदेशान्वये जामिनावर खुले केले असून सदर गुन्हा पोलीस तपासावर आहे.

वडगाव हवेली, ता-कराड येथील दरोड्याच्या गुन्ह्याप्रकरणी कराड पोलीस ठाण्यामध्ये गु.र.क्र.३४१/२०१७ भा.दं.वि.स. कलम ३९५, ३९७, १२०(ब) सह आर्म ॲक्ट कलम ३, २५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्यामध्ये निष्पन्न ७ आरोपींपैकी ५ आरोपींना अटक करण्यात आली असून १ आरोपी फरार आहे व एक विधिसंघर्षित बालक ताब्यात घेतल्यानंतर न्यायालयाचे आदेशान्वये जामिनावर खुले केले आहे. सदर गुन्ह्यातील ५ निष्पन्न आरोपी, १ फरार आरोपी व एक विधिसंघर्षित बालक यांचेविरूध्द मा. न्यायालयात दि.३/११/२०१७ रोजी दोषारोपपत्र दाखल केले आहे.

सदर परिसरातील गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी रात्र गस्त, दिवसाची पेट्रोलिंग, हायवे बीट पेट्रोलिंग, पोलीस मित्र, ग्रामसुरक्षा दले या माध्यामांद्वारे तसेच पोलीस समन्वयाद्वारे आटोकाट प्रयत्न करण्यात येत आहेत.
(५) विलंब झालेला नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.